# बृहन्मुंबई महानगरपालिका

उप.प्र.अभि./ इप्र / 6433/ पउप दि-04/09/2026

## स्वारस्य अभिव्यक्ती (अर्ज) जाहिरात

उप प्र.अभि.(इप्र)पउप-1 कार्यालय ,हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मंडई, जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड,जोगेश्वरी(पूर्व) या कार्यालयातील दैनदिन स्वच्छतेसाठी नमूद कामाचा अनुभव असलेल्या धर्मदाय आयुक्त/सहकार आयुक्त/ सहाय्यक संस्था निबंधक बृहन्मुंबई विभाग/दुय्यम निबंधक/उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, बहुउद्देशीय संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था, महिला मंडळ, अशासकीय संस्था /बचत गट इ.संस्थामधून स्वारस्य पदधतीने सीलबंद अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था, महिला मंडळ,स्थानिक अशासकीय संस्था /बचत गट इत्यादी यांना अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राचा नमुना उप प्र.अभि.(इप्र)पउप-1 यांच्या कार्यालयात रु.3993+18% (वस्तू व सेवा कर) रोख स्वरुपात नागरी सुविधा केंद्रात भरुन या कार्यालयास पावती सादर केल्यानंतर 07/09/2026 ते दि.10/09/2026 (शनिवार,रविवार,सार्वजनिक सुटटीचे दिवस वगळून) सकाळी 11.00 ते 4.00 (दुपारी) वाजेपर्यंत मिळू शकतील. सदर कामाबाबत कार्यालयात अर्ज भरण्याची अंतिम तारिख दि.10/09/2026 (दुपारी 4.00 वाजेपर्यंत) असेल. नमूद केलेल्या कालावधीनंतर कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

प्राप्त झालेल्या अर्जांची सोडत दि.11/09/2026 रोजी दुपारी 12.00 वाजता किंवा कार्यालयीन कामकाजाच्या सोयीनुसार करण्यात येईल.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना असतील व ते अर्ज करणा-या सर्व संस्थेस बंधनकारक असतील.

सही /-

**उप प्र.अभि.(इप्र)पउप-1**